# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
## खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

आदेश क्र. जिखप्र/प्रमा- पर्यावरण संरक्षण आणि प्रदुषण नियंत्रण उपायोजना /497/2026
दिनांक-31/03/2026

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "पर्यावरण संरक्षण आणि प्रदुषण नियंत्रण उपायोजना" या शिर्षकाखाली नागपूर शहर तालुक्यातील अंबाझरी तलावातील जलपर्णी काढणेस्तव Self-Propelled duel Purpose Skimmer Harvester Machine खरेदी करणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

वाचा-
1. भारत सरकार खाण मंत्रालय प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारीत मार्गदर्शक सूचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/ प्र.क्र. 10/उद्योग-9 मंत्रालय, मुंबई-32, दि. 11 ऑक्टोबर 2024
3. मा. आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपूर यांचे क्रमांक ज.प्रा/1658/मा.आ. दिनांक 31/03/2026
4. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागपुर महानगरपालिका, नागपूर यांचे तांत्रिक अनुमती पत्र क्र. No.CE/PWD/T.A./88/2025-26 दिनांक 31/03/2026
5. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक 31/03/2026 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 चे पत्रान्वये मा. आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपूर यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "पर्यावरण संरक्षण आणि प्रदुषण नियंत्रण उपायोजना" या शिर्षकाखाली नागपूर शहर तालुक्यातील अंबाझरी तलावात मोठया प्रमाणात जलपर्णी तयार झालेली असून सदर जलपर्णी पावसाळयात वाहुन शहरातील नदी व नाल्यात गेल्यास नदी/नाले तुडुंब भरुन पूरजन्य परिस्थिति निर्माण होऊ शकते. त्यामुळे या तलावातील जलपर्णी प्रभावी पध्दतीने काढणेस्तव Self-Propelled duel Purpose Skimmer Harvester Machine खरेदी करणे आवश्यक असून सदर खरेदी करीता अंदाजित किंमत **रू. 1,52,02,572/- (अक्षरी- रू. एक कोटी बावन लक्ष दोन हजार पाचशे बाहत्तर फक्त)** इतक्या प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ क्र. 4 चे पत्रान्वये मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागपुर महानगरपालिका यांनी उक्त कामांस तांत्रिक सहमती प्रदान केलेली आहे.

संदर्भ क्र. 5 च्या टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे.

